# विकासपेडिया.इन

शेती | आरोग्य | शिक्षण | समाजकल्याण | ग्रामीण ऊर्जा | ई-शासन

## ग्रामीण भारताच्या विकासासाठी मराठी भाषेत नवे वेबपोर्टल –

मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये वेगाने होणाऱ्या प्रगतीमुळे माहितीचा वेगही वाढला आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर फक्त शहरी लोकांमध्येच दिसून येत आहे. त्यामानाने ग्रामीण लोकांमध्ये याचा वापर फारच अत्यल्प आहे, याची मुख्य दोन कारणे म्हणजे एकतर याचा वापर कसा करावा हे माहीत नसते आणि दुसरे म्हणजे उपलब्ध असलेली माहिती इंग्रजी भाषेत असते. परिणामस्वरूप ग्रामीण व शहरी लोकांमध्ये ज्ञानाची, संवादाची दरी वाढताना दिसून येते. **विकासपेडिया** हे नवे वेबपोर्टल, ग्रामीण समूहांच्या गरजांनुसार स्थानिक भाषांमध्ये प्रतिसादात्मक आणि विश्वासार्ह माहितीची निर्मिती आणि साठवणूक करते. कोणीही, कधीही इंटरनेटचा वापर करून या पोर्टलवरून शेती, शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, ग्रामीण ऊर्जा आणि ई–शासन इ. संबंधी माहिती मराठी भाषेतून मिळवू शकतो. पोर्टलवरून हव्या त्या माहितीचे प्रिंटआऊट छापून घेऊन, इंटरनेट, कॉम्पुटर आणि वीज नसतानाही या माहितीचा वापर करू शकतो. तुम्ही स्वतः आपल्या माहिती व अनुभवावर आधारित लेख, सूचना मराठी भाषेत पोर्टलवर लिहू शकता. यासाठी तुम्हाला सदस्य किंवा मजकूरलेखक म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. सदस्य म्हणून नोंदणी केल्यानंतर तुम्ही सर्व लेखांबद्दल आपल्या सूचना टाइप करून पोस्ट करू शकता, 'चर्चामंच'मध्ये सहभागी होऊ शकता, मासिक बातमीपत्रसुद्धा वाचू शकता.

**विकासपेडिया वेबपोर्टल** हा एक भारत सरकारचा उपक्रम आहे. याद्वारे देशातील ग्रामीण विकास क्षेत्रातील विशिष्ट सामाजिक गरजांवर लक्ष दिले जाते. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाची सांगड घालून शासन, स्वयंसेवी संस्था, आणि खाजगीक्षेत्रातील विकासाच्या भागीदारांमध्ये समन्वय साधला जातो, ज्ञानाची देवाणघेवाण केली जाते. या पोर्टलला माहिती तंत्रज्ञान विभाग आणि दळणवळण व महिती तंत्रज्ञान मंत्रालयाचा पाठींबा आहे व यांचे संचलन हैद्राबाद येथील प्रगत संगणक विकास केंद्र (C-DAC) तर्फे केले जाते. हे पोर्टल ग्रामीण विकासास समर्पित असल्यामुळे यावरील माहिती वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे.

## पोर्टलचे मुख्य उद्देश –

१. माहिती तंत्रज्ञानाचे फायदे दुर्लक्षित, गरीब आणि आर्थिक मागासलेल्या लोकांपर्यंत पोहोचवणे हे आहे.
२. ग्रामीण विकासाच्या सेवा अधिक प्रभावीपणे पुरविण्यासाठी स्थानिक पातळीवरील सेवा पुरवठादारांची क्षमता वाढविणे.
३. निवड केलेल्या कृषी, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, समाजकल्याण, ग्रामीण ऊर्जा व ई–शासन या सहा मुख्य विषयांमधील विविध मुद्द्यांवर प्रत्यक्ष अंतिम लाभार्थ्यांना शिक्षित करणे, माहिती सेवांची उपलब्धता, संपर्क क्षमता यांच्यासाठी एक मार्ग म्हणून तंत्रज्ञानाचा उपयोग करणे.

## पोर्टल निर्माण करण्यामागील दृष्टीकोन –

१. विविध कार्यक्षेत्रातील हिस्सेदारांसोबत सहजीवी भागिदारी करणे.
२. अन्य पोर्टल्स सोबत संपर्क करणे आणि त्यासाठीचे पुढाकार घेणे.
३. माहिती व सेवा प्रदान करणे व यासाठी स्थानिक भाषेचा वापर करणे.
४. माहिती व स्रोतांची देवाणघेवाण करण्यासाठी मंच उपलब्ध करून देणे, माहिती एकत्रित करणे व प्रसारित करणे आणि यासाठी एक नियोजनबद्ध टिकाऊ रचना तयार करणे.

## विकासपेडिया वेबपोर्टलवर मराठीभाषेत खालील सहा विभागांची माहिती उपलब्ध आहे –

**शेती – आरोग्य – शिक्षण – समाजकल्याण – ग्रामीण ऊर्जा – ई–शासन**
तसेच ऑनलाईन सेवा, मल्टिमिडीया उत्पादने व शिक्षणाचे स्रोत, इ. माहितीही देण्यात आली आहे.

## स्वयंसेवक बना, सहभागी व्हा...

**स्वयंसेवक कोण होऊ शकतो ?**
शिक्षक, शेतकरी, पत्रकार, विद्यार्थी, ग्रामसेवक, रोटरी क्लब, मुख्याध्यापक, आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी, महाविद्यालये, गावपातळीवर काम करणाऱ्या सेवाभावी संस्था व इतर.

**आपण खालील प्रकारे स्वयंसेवक बनू शकता –**
१. **माहिती देणारा/लेखक** – माहिती देणारा स्वयंसेवक हा दोन प्रकारे काम करू शकतो. एक जो वेबपोर्टलवर लॉगइन् करून माहिती लिहू शकतो व दुसरा जो वेबपोर्टलसाठी माहिती राज्यस्तरीय मध्यवर्ती संस्थेकडे पाठवू शकतो.
२. **माहिती संकलक** – जो वेबपोर्टलसाठी विविध प्रकारची माहिती इतरांकडून जमा करून राज्यस्तरीय मध्यवर्ती संस्थेकडे पाठवू शकतो.
३. **माहिती समिक्षक** – वेबपोर्टलवरील उपलब्ध माहिती हा माहिती समिक्षक संपादन करू शकतो. यासाठी माहिती समिक्षक हा त्या विषयातील तज्ज्ञ असावयास हवा.
४. **माहिती प्रवर्तक** – माहिती प्रवर्तकाने वेबपोर्टल व त्यावरील उपलब्ध माहितीची प्रसिद्धी त्यांच्या प्रकल्पातील बैठकीमध्ये, कार्यक्रमामध्ये, प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये व इतर सामाजिक कार्यक्रमामध्ये दिली पाहिजे.

५. **माहिती प्रसारक** – माहिती प्रसारक हे गावपातळीवरील काम करणारे लोक असतील. त्यामध्ये शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा कर्मचारी, ग्रामसेवक, गावपातळीवर काम करणाऱ्या संस्थांचे कर्मचारी, त्याचबरोबर गावातील सेवा केंद्र यांचा समावेश असेल. हे सर्व वेबपोर्टलवरील माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करतील.

## विकासपेडिया.इनवर खालीलप्रमाणे नोंदणी करा –

mr.vikaspedia.in या पोर्टलवर गेल्यावर 'नोंदणी करा'वर click करा.

'नोंदणी अर्ज' हे पेज ओपन होते. यावर खालील दोन पर्याय येतात.

अ. सदस्य म्हणून नोंदणी करा

ब. मजकूरलेखक म्हणून नोंदणी करा

यापैकी 'मजकूरलेखक' म्हणून नोंदणी करावर click करा. Click केल्यानंतर त्याखाली फॉर्म येतो तो भरायचा आहे. त्यात पूर्ण नाव, स्वतःचा इमेल, दूरध्वनी क्रमांक, वयोगट, लिंग, पत्ता, राज्य, जिल्हा, पात्रता, पिनकोड, प्राविण्याचे क्षेत्र, अनुभव ही माहिती भरायची आहे. त्याचबरोबर 'अटी व शर्ती मला मान्य आहेत' यावर click करा आणि तिथे दिलेला संकेतनंबर टाईप करा व शेवटी 'नोंदणी करा'वर click करा. त्यानंतर आपल्या इमेल आयडीवर एक इमेल येईल त्या इमेलमधील 'लिंक'वर click करून आपल्या vikaspedia.in च्या अकौंटचा पासवर्ड सेट करा. (दिलेल्या सूचनेप्रमाणे पासवर्ड असला पाहिजे) पासवर्ड सेट झाल्यानंतर आपल्या इमेल आयडी लॉगइन् करा. आपण आपल्याजवळील उपयुक्त माहिती आपण ठरविलेल्या विभागातील मुख्य फोल्डरमधील उपविभागांमध्ये नवीन पेज तयार करून टाकू शकता. आपल्याला नोंदणीकरताना काही अडचण आली तर शेवटी दिलेल्या नंबरवर संपर्क करा.

## लेख कसा लिहावा –

१. लेख लिहिताना तो योग्य भाषेमध्ये लिहावा. त्यात अत्यंत कठीण मराठी शब्दांचा वापर करू नये तसेच जास्त प्रमाणात इंग्रजी भाषेतील शब्दांचा वापर करू नये. हे लेख सर्व सामन्यांसाठी असल्याने ते सोप्या आणि सुटसुटीत शब्दात लिहावेत.

२. लेखामध्ये जर स्थानिक शब्द वापरायचे असतील तर त्या शब्दापुढे कंसात मराठी किंवा इंग्रजी शब्दाचा वापर करावा.

३. लेख साधारणत: प्रस्तावना, विषय प्रवेश, मुख्य गाभा आणि समारोप या भागामध्ये विभागला जावा.

४. लेख ज्या विषयावर लिहायचा आहे त्याला अनुसरून लेखाला योग्य शीर्षक द्यावे.

५. एका विषयावर एक लेख लिहावा. अनेक विषयांची माहिती एका लेखामध्ये लिहू नये.

६. लेख लिहिताना लेख हा रिपोर्ट या प्रकारात नसावा. आपण स्वत: काय केले हे सांगण्यापेक्षा त्यात केलेली प्रोसेस किंवा प्रक्रिया सांगावी.

७. लेखात माहिती स्पष्टपणे, मुद्देसूद मांडलेली असावी. पाल्हाळ (अनावश्यक विस्तृत वृत्तांत) लावू नये. ज्या विषयावर आपण लेख लिहीत आहोत, तो विषय सोडून इतर अवास्तव माहिती लिहू नये.

८. लेखामध्ये थेट विषयाला सुरुवात करू नये. त्यात सुरुवातीला विषयाची ओळख करून द्यावी व आपल्या गावाचे, तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव द्यावे. मग मुख्य विषयाला सुरुवात करावी.
९. लेखामध्ये आपले स्वत:चे वैयक्तिक मत न देता लेखाला अनुरूप असा शेवट करावा.
१०. लेखाबरोबर फोटो जर द्यायचा असेल तर त्या फोटोसंबंधी माहिती देणे आवश्यक आहे (उदा. झाडाचे नाव, पिकाचे नाव).
११. फक्त फोटो लेख म्हणून न पाठवता त्या फोटो सोबत एक ५ ते १० ओळीमध्ये त्याबद्दलची माहिती लिहून पाठवावी.
१२. आपल्याला माहीत नसलेल्या विषयावर लेख लिहू नये.
१३. लेखामध्ये सरकारची, नेत्यांची, जाती-धर्माची, सरकारी अधिकाऱ्यांची, संस्थांची, इतर व्यक्तींची तसेच महिलांची बदनामी करू नये.
१४. लेख लिहून झाल्यावर आपण स्वतः वाचून त्यातील त्रुटी दूर कराव्यात.
१५. लेखाच्या शेवटी खालील मुद्दे समाविष्ट करावेत
लेखाचा स्रोत, लेखाशी संबंधित लोकांचे नाव, स्वतःचे नाव.

## मध्यवर्ती संस्था वॉटरची भूमिका -

**या बहुभाषिक वेबपोर्टलच्या मराठी भाषेतील विभागासाठी 'वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट'ची राज्यस्तरीय मध्यवर्ती संस्था (State Nodal Agency) म्हणून निवड झालेली आहे.**
**'वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट' (वॉटर)** ही एक स्वयंसेवी संस्था आहे. वॉटर संस्थेची स्थापना १९९३ मध्ये झाली. वॉटर संस्था ही पाणलोटक्षेत्रविकास आणि हवामानातील बदल अनुकूलन कार्यक्रम या क्षेत्रामध्ये काम करणारी भारतातील अग्रणी संस्था आहे. आज वॉटर संस्थेचे कार्य महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, झारखंड, ओरीसा या राज्यांमध्ये पसरलेले आहे.

## विकासपेडिया.इन या वेबपोर्टलच्या कार्यात वॉटर संस्थेचे पुढीलप्रमाणे योगदान राहील -

- ✓ महाराष्ट्रातून या बहुभाषिक पोर्टलवर मराठीभाषेतून सहा प्रमुख क्षेत्रांमधील माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी स्वयंसेवक तयार करणे, यामध्ये व्यक्ती व इतर संस्थांचा समावेश असेल.
- ✓ शक्य तिथे या वेबपोर्टलवर सहा प्रमुख क्षेत्रांमधील माहिती इंग्रजी विभागासाठी इंग्रजी भाषेतून देण्याचा प्रयत्न राहील.
- ✓ गरजेप्रमाणे किंवा मागणीप्रमाणे त्या त्या विषयांची माहिती या वेबपोर्टलवर दिली जाईल.
- ✓ स्वयंसेवकांची कार्यक्षमता सुधारणे, इतर संस्था व लोकांना या वेबपोर्टलशी जोडणे.
- ✓ भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार याविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे व या वेबपोर्टलचा वापर ग्रामीण भागात सर्व स्तरावर होण्यासाठी प्रयत्न करणे.
- ✓ वेबपोर्टलवरील सर्व विभागांमध्ये योग्य प्रकारे माहिती मिळेल याची खात्री करणे.

Design: fatherofshr@gmail.com Print: Mudra

सत्यमेव जयते
माहिती तंत्रज्ञान विभाग
भारत सरकार

सी डैक
CDAC
प्रगत संगणक विकास केंद्र
Jawaharlal Nehru Technological University (JNTU) Campus,
Kukatpalli, Hyderabad 500085,
Andhra Pradesh

WOTR
water gives life
**Watershed Organisation Trust (WOTR)**
'The Forum', 2nd Floor, S.No. 63/2B, Padmavati Corner,
Pune Satara Road, Parvati, Pune 411009, India.
Phone: +91-20-24226211 • Fax: +91-20-24213530
Email: info@wotr.org • Website: www.wotr.org